मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. : १/६०
दिनांक : २५/०४/२०२३

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/ ७४८
दिनांक : २५/०४/२०२३

-: आ ज्ञा प त्र :-

**विषय :** पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - (वर्ग- ३)" या पदावरील सेवकांच्या पदस्थापनेबाबत.

**संदर्भ :** १) आज्ञापत्र जा. क्र. अतिमआ(ज) /साप्रवि/९९१०, दि.३०/१२/२०२२
२) आज्ञापत्र जा. क्र. अतिमआ(ज) /साप्रवि/९९७४, दि.०३/०१/२०२३
३) आज्ञापत्र जा. क्र. अतिमआ(ज) /साप्रवि/१२३२०, दि.२७/०२/२०२३
४) आज्ञापत्र जा. क्र. अतिमआ(ज) /साप्रवि/१३४६७, दि.२८/०३/२०२३
५) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र. १/५९, दि.२५/०४/२०२३

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग- ३ (पे मेट्रीक्स S-१४ : ३८६०० – १२२८०० + मान्य भत्ते) या पदाच्या शेड्युलमान्य रिक्त जागेवर संदर्भ क्र. १ अन्वये हंगामी नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ क्र. २ अन्वये सदर सेवकांचा निश्चित केलेला सहा महिने कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम या आदेशान्वये अधिक्रमीत करण्यात येत असून याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील.

संदर्भ क्र. १ चे आज्ञापत्रामधील मूळ नियुक्तीच्या अटी व शर्ती कायम ठेवून खालील सेवकाची या आज्ञापत्राच्या दिनाकांपासून पदस्थापना करण्यात येत आहे.

**"कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य) - (वर्ग- ३) (पे मेट्रीक्स S - १४ : ३८६०० – १२२८००+ मान्य भत्ते)"**

| अ. क्र. | सेवकाचे नाव | सेवकाचा मुळ/ अर्जातील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1) | PAWANKUMAR BHIMRAO JOGAWAR | ST | ST | अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| 2) | BHAVIKA PRATAPSING THAKUR | ST | ST_F | अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम/निर्मुलन विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |

१) वरील सेवकांनी जात वैधता प्रमाणपत्र पुढील सहा महिन्यात सादर करावी. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कामावरून कमी करणेत येईल, याची नोंद घ्यावी. याबाबत कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोरील प्रतिज्ञापत्र सादर करावे.

२) संदर्भ क्र. १ चे आज्ञापत्रातील अटी व शर्ती पूर्ण करून घेणेची दक्षता संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावयाची आहे.

३) वरील सेवकांची प्रत्यक्ष कामावर रुजू झाल्याचे दिनांकापासून प्रशिक्षणासह दोन वर्षातील कार्यालयीन उपस्थिती, वर्तणूक व कामातील प्रगती समाधानकारक/ असमाधानकारक असल्याची संबंधीत खातेप्रमुख यांनी खात्री करावी. तसेच सेवकांचे दोन वर्षातील काम समाधानकारक / असमाधानकारक याबाबतचा

लेखी अहवाल महानगरपालिका सेवाविनियमातील अट क्र. १० अ नुसार संबंधित खातेप्रमुखांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा.

४) सेवकाचे काम असमाधानकारक असल्याचा अहवाल संबंधित खातेप्रमुख यांचेकडून प्राप्त झाल्यास सेवकास कोणतेही कारण अगर पूर्वसुचना न देता पुणे महानगरपालिका सेवेतून कमी करण्यात येईल.

५) संदर्भ क्र. १ व या आज्ञापत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता झाल्याची खातरजमा खातेप्रमुखांचे अहवालानुसार, परिविक्षाधीन कालावधी संपल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणेचे आदेश निर्गमित करण्यात येतील. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित झाल्यानंतरच सेवकास पुढील येणारी वेतनवाढ अनुज्ञेय करण्यात यावी. याबाबतची दक्षता संबंधित विभागप्रमुख, मुख्य लेखा व वित्त विभाग आणि माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी घ्यावी.

६) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली २०२१ मधील तरतुदीनुसार सेवकांची ज्येष्ठता राहील.

७) वरील सेवकांना महानगरपालिका सेवाविनियमानुसार वेतन व भत्ते महानगरपालिका सेवेत रुजू दिनांकापासून पदस्थापनेच्या खात्याने अदा करावयाचे आहेत. संदर्भ क्र. १ चे व या आज्ञापत्रातील उपरोक्त सर्व अटी/शर्ती संबंधित सेवकांवर बंधनकारक राहतील.

वरील सर्व अटी/शर्तींची काटेकोरपणे पूर्तता संबंधित सेवकाकडून करुन घेणेची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख यांची राहील.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी जरुर ती तजवीज करावी.

Ravt

(रविंद्र बिनवडे)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका
18/4/2023

प्रत : १) संबंधित खातेप्रमुख /विभागप्रमुख, पुणे महानगरपालिका
२) मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका
३) माहिती व तंत्रज्ञान विभाग, पुणे महानगरपालिका

माहिती व पुढील कार्यवाहीसाठी...